Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 19TH MAY 1898.

Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २८ माहे मार्च सन १८९८ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे :—**

### सन १८९८ चा आक्ट ७ वा.

**सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट जास्त सुधारण्याबाबद आक्ट.**

ज्याअर्थी सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट जास्त सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीलप्रमाणें ठरविलें आहे :—

१. (१) या आक्टास सन १८९८ चा पिट्रोलियम आक्ट असें ह्मणावें ; आणि — लहान सरनामा व सुरुवात.

(२) तो एकदम अमलांत येईल.

२. सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट, याच्या ३ ऱ्या कलमांत, रकम (१) हिजबद्दल खालील रकम दाखल केली पाहिजे. ती येणेंप्रमाणें :— — सन १८८६ चा आक्ट १२, याच्या ३ ऱ्या कलमांत "पिट्रोलियम" याची नवीन व्याख्या दाखल करणें.

"(१) 'पिट्रोलियम' या शब्दांत आणखी—

(अ) राकआइल, रंगूनआइल, बर्माआइल, केरोसीन, प्याराफीनआइल, मिनरलआइल, पिट्रोलीन, ग्यासोलीन, बेन्झोल, बेन्झोलीन व बेन्झीन, या नांवांनीं जे प्रवाही पदार्थ साधारणपणें माहीत आहेत त्यांचा,

(ब) पिट्रोलियम, कोल [ विलायती कोळसा ], शिस्ट, शेल, पीट किंवा दुसरा कोणताही बिट्यूमनी पदार्थ, यापासून केलेला, किंवा पिट्रोलियमपासून उत्पन्न झालेल्या कोणत्याही पदार्थापासून केलेला कोणताही लवकर पेटणारा प्रवाही पदार्थ याचा, आणि

(क) सदरीं सांगितलेल्या प्रवाही पदार्थांपैकीं कोणताही पदार्थ ज्या कोणत्याही प्रवाही किंवा चिकट मिश्रणाच्या घटनेंत असेल त्या मिश्रणाचा,

समावेश होतो :

परंतु त्यांत, जें कोणतेंही तेल साधारणपणें ओंगण करण्याच्या कामीं लावलें जात असून ज्याचा ज्वलनबिंदु फारन्हैटच्या उष्णतामापक यंत्राच्या दोनशें अंशांइतका किंवा त्यांच्यावरती असेल त्या तेलाचा समावेश होत नाहीं :".

सन १८८६ चा आक्ट १२, याच्या ४ थ्या कलमास नवीन पोटकलमें जोडणें.

३. सदरहू आक्टाच्या ४ थ्या कलमास खालील पोटकलमें जोडलीं पाहिजेत. तीं येणेंप्रमाणें :—

" (३) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, या आक्टास जोडलेलें परिशिष्ट, तपासणीचे नवीन प्रकार ठरवून किंवा त्यांमध्यें फेरबदल करून, आणि तें तयार करण्याकरितां व उपयोगांत आणण्याकरितां समजुती फर्मावून, फिरविण्याचा किंवा वाढविण्याचा अधिकार आहे ; आणि या आक्टांत त्या परिशिष्टावर दिलेले सर्व हवाले, तें फिरविलें किंवा वाढविलें जाईल तेव्हां, याप्रमाणें फिरविलेल्या किंवा वाढविलेल्या परिशिष्टावर त्या त्या वेळापुरते दिले आहेत असें समजावें.

(४) सन १८९७ चा सामान्य कलमांचा आक्ट याच्या २३ व्या कलमाचे ठराव, पोटकलम (३) याअन्वयें प्रसिद्ध करावयाच्या जाहिरनाम्यांस, आधीं प्रसिद्ध करून नंतर ठरवावयाच्या कानूंदाखल किंवा हुकुमांदाखल ते जाहिरनामे असल्याप्रमाणें, लागू होतील."

जे. एम्. म्याक्फर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

---

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.